# महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गडकरी चौक जुना आग्रा रोड नाशिक
दुरध्वनी क्रमांक २५७५६१५, फॅक्स क्रमांक २५७९२०८

---

क्र.शाआशा-२०११/प्र.क्र. १८ /का.६(५)
दिनांक : मे २०११

प्रति,

मा.संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासकीय भवन १७ वा माळा
मंत्रालय मुंबई-३२

**विषय :- अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेमध्ये शिक्षण देणे बाबत नामांकित सस्थाकडून अभिस्वारस्य मागविण्यासाठी जहिरात प्रसिध्द करणे.**

कृपया या सोबत जोडलेली जाहिरात प्रसिध्द करणेसाठी विनंती करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जाहिरात देणा-या अधिका-याचे पदनाम पत्ता व दुरध्वनी क्रमांक | :- | आयुक्त , आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक आदिवासी विकास भवन पहिला माळा गडकरी चौक नाशिक पिन कोड नं. ४२२ ००२ |
| २) | कोणत्या जिल्हयातील कामा संबंधी आहे. | :- | राज्यातील सर्व जिल्हयाच्या स्तरावर |
| ३) | कोणत्या तारखेस प्रसिध्द करावयाची आहे. | :- | ६ मे २०११ |
| ४) | जाहिरात किती वृत्तपत्रात प्रसिध्द करावयाची आहे व किती वेळा | :- | राज्यातील सर्व जिल्हयाच्या प्रत्येकी एका मराठी व इंग्रजी प्रमुख वृत्तपत्रातून १ वेळा |
| ५) | प्रसिध्दीचे स्वरुप | :- | राज्यस्तर |
| ६) | जाहिरातीचे देयक कोणाच्या नावाने करावे त्या कार्यालयाचा पूर्ण पत्ता | :- | आयुक्त , आदिवासी विकास , महाराष्ट्र राज्य नाशिक आदिवासी विकास भवन पहिला माळा गडकरी चौक, नाशिक पिन कोड नं. ४२२ ००२ |

स्वाक्षरी /-
(ज्ञा.स.राजूरकर )
आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक

प्रत :-१) सहाय्यक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासकीय भवन १७ वा माळा मंत्रालय मुंबई यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी.
२)मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर

आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

**महाराष्ट्र शासन**

# आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक

आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गडकरी चौक जुना आग्रा रोड नाशिक

---

## जाहिरात देण्यासाठी मसुदा

आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात २४ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये सुरु आहे. प्रत्येक प्रकल्प कार्यालयातंर्गत शहरातील इंग्रजी माध्यमाच्या काही उत्कृष्ट व दर्जेदार नामांकित निवासी शाळा निवड करणे शासनाच्या विचाराधीन आहे. त्याअनुषंगाने शहरात इंग्रजी माध्यमाची शाळा चालवणा-या नामांकित संस्थाकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जदार संस्थेची पात्रता, अटी व शर्ती खालील नमुन्यात दिल्याप्रमाणे राहतील.

१) शैक्षणिक संस्था किमान ५ वर्षापासून अस्तित्वात असावी व संस्थेची इंग्रजी माध्यमाची निवासी शाळा सुरु असावी.

२) संस्था धर्मदाय उपआयुक्त /सहाय्यक आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत केलेली असावी.

३) संस्थेचा मागील ३ वर्षाच्या लेखापरिक्षेत अहवालाच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील. तसेच विद्यमान निवासी शाळा चालविण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र दिलेले असावे. तसेच शालेय शिक्षण विभागाने मान्यता दिली असावी.

४) संबंधीत संस्थांच्या शाळामधील इयत्ता १० वी व १२ वी चे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे ,सीबीएसई व आयसीएसई बोर्डाचे मागील ३ वर्षाचे निकाल उत्कृष्ट असावेत.

५) संबंधीत संस्थांच्या शाळांमधील इ. १० वी व १२ वी च्या वर्गास महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे,सीबीएसई व आयसीएसई बोर्ड यापैकी एका मंडळाचा इंडेक्स नं. प्राप्त असावा.

६) संस्थेच्या निवासी शाळेत भोजन कक्ष , मुला/मुलींचे स्वंतत्र वसतीगृह, पुरेसे स्नानगृह, शौचालये, क्रीडांगण इत्यादी मुलभूत सुविधा शालेय/निवासी इमारती उपलब्ध असाव्यात.

७) संस्थेच्या नामांकित शाळेत प्रयोगशाळा,वाचनालय,संगणककक्ष, भोजनगृह,वैद्यकिय सोई, क्रीडांगण सुविधा व सुरक्षा इत्यादी बाबतची सुविधा असावी.

तरी उपरोक्त बाबींची पूर्तता करणा-या नामांकित शैक्षणिक संस्थांनी आपले अर्ज विहीत नमुन्यात पूर्ण भरुन दिलेल्या मुदतीत आपल्या जवळच्या प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे कार्यालयात दिलेल्या मुदतीत सादर करावेत. मुदतीत अर्ज प्राप्त न झालेल्या संस्थांच्या विचार केला जाणार नाही तसेच या योजनेचा शासन निर्णय योजनेच्या अटी व शर्ती ,प्रस्ताव सादर करावयाच्या अर्जाचा नमुना फॉर्म प्रकल्प अधिकारी व त्यांचे कार्यक्षेत्र या बाबतची यादी तसेच विद्यार्थी फी बाबत दरपत्रक याबाबतची माहिती या विभागाची वेबसाईट www.mahatribal.gov.in वर पहावयास मिळेल.

परिपूर्ण भरलेले अर्ज लिफाफयात बंद करुन लिफाफयावर ठळक अक्षरात कोणत्या प्रकल्पातील विद्यार्थ्यांसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. हे नमूद करुन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या पत्त्यावर दिनांक ३० मे २०११ ला सांयकाळी ५.०० वाजे पर्यंत सादर करावेत. यानंतर प्राप्त होण-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**स्थळ प्रतीवर मा.आयुक्त महोदयांची स्वाक्षरी आहे.**

आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

**Government of Maharashtra**
**Office of the Commissioner,**
**Tribal Development Department,**
**Maharashtra State, Nashik-2**

# A D V E R T I S E M E N T

Government of Maharashtra, Tribal Development Department proposes to invite applications from the renowned educational institutions running English Medium residential Schools with a view to provide an opportunity to scheduled tribe students to seek education in renowned schools with students of other community.

Educational Institutions should be registered with the Charity Commissioner and affiliated to the State Board of Secondary and Higher Secondary Education / C.B.S.E or I.C.S.E. duly permitted to run residential school and posses no objection certificate from the competent authority.

The school shall have well developed infrastructure with all basic amenities like dinning-hall, separate self content hostels for boys and girls, well furnished school building, computer lab, laboratories, playgrounds etc. The X and XII Board Examination results of the school for last three years should be excellent.

Institutions fulfilling the aforesaid terms and conditions may approach the nearest project officer ,Integrated Tribal Development Project or log on to www.mahatribal.gov.in for prescribed application form and further details. Interested Institutions may submit their application complete in all respect to the concerned Project Officers on or beore 30 may 2011 during working hours.

**OC Signed by Commissioner**

**Commissioner,**
**Tribal Development Department,**
**Govt.Of Maharashtra, Nashik-2 For**